Reg. No. SAT/KRD/BNK/(O) - 113/16.03.95

# आदरणीय पी. डी. पाटीलसाहेब सहकारी बँक लि.,कराड

मुख्य कार्यालय-१५/३ क, टिळक रोड, मंगळवार पेठ, कराड

## तेवीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

आदरणीय पी.डी.पाटीलसाहेब सहकारी बँक लि., कराड या बँकेच्या सभासदांची तेवीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २२ जुलै २०१८ रोजी दुपारी २ वाजता सौ.वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्ट, कराड येथे बँकेचे चेअरमन श्री. अशोक पांडुरंग पाटील यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सदर सभेस आपण अगत्याने उपस्थित रहावे, ही विनंती.

**-सभेपुढील विषय-**

१) मागील दि.१३ ऑगस्ट २०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०१७-१८ सालचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.
३) सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे व सन २०१७-१८ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
४) दि.३१ मार्च २०१८ अखेरचे नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
५) शासकीय लेखापरिक्षकाकडून आलेल्या सन २०१७-१८ सालचे हिशोब तपासणी अहवालाची व त्याच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
६) सन २०१८-१९ करिता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
७) सन २०१८-१९ करिता अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
८) बँकेचे नियोजीत भांडवली खर्चास मंजुरी देणे.
९) बँकेच्या पुढील पाच वर्षाची ध्येय धोरणे व कृती आराखडा अवलोकनी घेऊन त्यास मान्यता देणे.
१०) मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,पुणे यांचेकडे विविध शाखांच्या जागा / इमारत खरेदीसाठी बी.डी.डी.आर.निधीतील रक्कम वापराबाबत प्रस्ताव पाठविणेस मंजुरी देणे.
११) आजचे वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१२) मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्तीस मंजुरी देणे.
१३) मा.संचालक व नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
१४) मा.अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांचा विचार करणे.

मा.संचालक मंडळाचे आदेशावरून

स्थळ-कराड
दिनांक-२८ जुन २०१८

**एन.जी.मोमीन**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**: विशेष सूचना :**

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झालेस सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सुरू होईल. त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही. २) कामकाजाच्या संदर्भात काही माहिती अगर तपशील पाहिजे असल्यास सभासदांनी बँकेच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा. ३) बँकेचा दि. ३१ मार्च २०१८ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटापत्रक इत्यादी दै.प्रितीसंगम दि.३० जुन २०१८ च्या अंकात प्रसिद्ध केले असून तो अंक पोस्टामार्फत सर्व सभासदाना पाठविला आहे. ४) दि.३१ मार्च २०१८ अखेरचा बँकेचा ताळेबंद, नफा तोटापत्रक, कॅश फ्लो स्टेटमेंट, वैधानिक लेखापरिक्षण रिपोर्ट इ. वार्षिक अहवालाची संपुर्ण माहीती मुख्यालयासह सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर सभासदांच्या माहितीसाठी प्रसिध्द केली आहे. तसेच बँकेची वेबसाईट www.pdpatilsahebbank.com ला वर प्रसिध्द केली आहे.